| स्थापना: जून १९९१ | "स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" – कर्मवीर<br>रयत शिक्षण संस्थेचे,<br>**चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी**<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र) पिन- ४१६२०३<br>**भूगोल विभाग** | |
|---|---|---|

दि. १४/१२/२०२५

## अहवाल

## १२ डिसेंबर मा. खासदार शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित भित्तीपत्रके

१२ डिसेंबर हा मा. खासदार शरदचंद्र पवार यांचा वाढदिवस. या निमित्ताने कॉलेजमध्ये भित्तीपत्रकाचे आयोजन केले होते. यामध्ये भूगोल विभागामार्फत **"मा. खासदार शरदचंद्र पवार यांचे शैक्षणिक कार्य : थोडक्यात आढावा"** या विषय माहिती मिळून बी. ए. भाग २ व ३ मधिल विद्यार्थ्यांनी वेगळी भित्तीपत्रके तयार करण्यात आली यासाठी भूगोल विभागातील सर्व प्राध्यापक यांनी मार्गदर्शन केले.

मा. शरदचंद्र पवार यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानून ग्रामीण भागात दर्जेदार शिक्षणसंस्था उभारल्या. बारामती येथे 'विद्यानगरी' निर्माण करून ग्रामीण विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून दिले. १९८३ साली स्थापन झालेल्या विद्या प्रतिष्ठान, बारामती अंतर्गत प्राथमिक ते उच्च, व्यावसायिक, तांत्रिक, कृषी, महिला, क्रीडा व कौशल्याधारित शिक्षणाची व्यापक व्यवस्था उभी केली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व उपेक्षित घटकांसाठी मोफत व सवलतीचे शिक्षण ही त्यांच्या दृष्टिकोनाची ओळख आहे.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी गुणवत्ता, संशोधन व आधुनिकतेवर भर दिला. प्राथमिक शिक्षण, स्त्री शिक्षण, डिजिटल व वैज्ञानिक शिक्षण, संशोधन व सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधणारी 'शिक्षण सर्वांसाठी' ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आज जागतिक स्पर्धेत सक्षमपणे उभे राहिले आहेत.

|  |  |
|---|---|
| उद्घाटनप्रसंगी मा. प्राचार्य विभाग प्रमुख व मान्यवर | उद्घाटनप्रसंगी मा. विभाग प्रमुख व विद्यार्थी |

Head
Department Of Geography
Chandrabai-Shantappa Shendure College
Hupari

Principal
Chandrabai-Shantappa Shendure College,
Hupari.